श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

दि. २६ नोव्हेंबर, २०२६

पुन:दरपत्रक मागविण्यासंदर्भातील सूचना

बुधवार, दि. २३ डिसेंबर,२०२६ (दत्त जयंती),व शुक्रवार, दि. ०१ जानेवारी,२०२७ (नूतन वर्ष) या दिवसांमध्ये आकर्षक फुलांची सजावट करून घेण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

बुधवार, दि. २३ डिसेंबर,२०२६ (दत्त जयंती),व शुक्रवार, दि. ०१ जानेवारी,२०२७ (नूतन वर्ष) या दिवसांमध्ये आकर्षक फुलांची सजावट करण्यात येते. त्यानुषंगाने वरील दिवशी मंदिर गाभारा ,गाभारा बाहेरील परिसर व प्रवेशद्वार क्र.०१ येथे फुलांची सजावट करण्यात येत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

अ. क्र.	फुलांची सजावट करण्यासाठी फूले/साहित्यांचा तपशील	दिनांक	रक्कम (कर वगळून)
१	गोंडा (नेकलेस तोरण)–२६० किलो, शेवंती (नेकलेस तोरण)–५० किलो, कापरी गोंडा–२० किलो, अशोक पाला–१५० बंडल, जरबरा–१०० बंडल, ऑर्चिड–२५ बंडल, गुलाब–४० बंडल, कार्निशन–२० बंडल, अंन्थोरिअम–२० नग, बटन शेवंती–२५ बंडल, डेझी–२५ बंडल, कामिनी–१५० बंडल, २ जोडी केळयाचे खांब, ओयासिस–३ बॉक्स, जाळी–५ किलो, सुतळ–३ किलो, लिडर–१५ नग	(श्रीदत्त जयंती) दि. २३ डिसेंबर,२०२६	
		(नूतन वर्ष) दि. ०१ जानेवारी,२०२७	

अटी व शर्ती :–

१) बुधवार, दि. ०२ डिसेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मोहोरबंद दरपत्रकाचा लिफाफा लाखेने सिलबंद करून प्रतिक्षालयाच्या तळ मजल्यावर टपाल कार्यालयात सादर करावा. ए–४ साईजचे दोन मोठे लिफाफे (एक तांत्रिक लिफाफा व एक मूल्य लिफाफा) लाखेने सिलबंद करून न्यासास सादर करावे. तसेच लिफाफ्यामधील मूल्य दर व तांत्रिक कागदपत्रांच्या प्रत्येक पानावर दरपत्रकधारकाची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असणे आवश्यक आहे. एका बाजूला दरपत्रकधारकाचे संपूर्ण नाव, पत्ता व संपर्क क्रमांक लिहिण्यात यावे तसेच दुसऱ्या बाजूला श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास प्रभादेवी, मुंबई, देखभाल व दुरूस्ती विभाग असे लिहावे. शुक्रवार, दि. ०४ डिसेंबर, २०२६ रोजी दुपारी २.०० वाजता न्यासाच्या तिसऱ्या मजल्यावरील समिती कक्षात मोहोरबंद दरपत्रकांचे लिफाफे उघडण्यात येतील.

२) दरपत्रक सादर करताना दरपत्रकात (BOQ) नमूदप्रमाणे रक्कम भरावी. दरपत्रकधारकारांनी BOQ मधील सर्व संभाव्य बाबींचा साकल्याने विचार करून मूल्य दरामध्ये समाविष्ट करून रक्कम भरावी.

दरपत्रक सादर करताना सोबत जोडावयाची कागदपत्रे.

अ) कंपनी नोंदणी दाखला (महाराष्ट्र दुकाने व आस्थापना किंवा उद्यम रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट)

ब) पॅनकार्ड.

क) मागील तीन वर्षाचे आयकर विवरणपत्र (आर्थिक वर्ष २०२२–२३, २०२३–२४ व २०२४–२५)

ड) **फुलांची सजावट** करण्याबाबतचा अनुभवाचा दाखला.(किमान १ वर्षाचा असावा याकरीता प्रत्येक वर्षाचे किमान एक कामाचे कार्यादेश,कामाचे देयक जोडावे) दरपत्रकधारकाकडे देवस्थान, चॅरीटेबल ट्रस्ट, नामांकित कंपन्या, शासकीय, निम शासकीय, महानगर पालिका, संस्था तसेच अन्य मोठया धार्मिक संस्थाकडे फुलांची सजावट करण्यासंदर्भातील अनुभव असणे आवश्यक आहे.

३) दरपत्रकधारक हा हिंदू असावा

४) ज्यादिवशी मोहोरबंद दरपत्रक लिफाफे उघडण्यात येणार आहे त्या दिवशी दरपत्रकधारकाच्या प्रतिनिधिंनी उपस्थित राहणे गरजेचे आहे. जर दरपत्रकधारकाचा प्रतिनिधी गैरहजर राहील्यास सदर बैठकीत अटी व शर्तीमध्ये काही बदल, सुधारणा व शिथिल करण्याचा निर्णय न्यासाने घेतल्यास दरपत्रकधारकास तो निर्णय मान्य करावा लागेल. याबाबत दरपत्रकधारकाची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

५) विद्युत रोषणाई करतांना सुरक्षा नियमांचे पालन करावे. व त्याची योग्य ती खबरदारी घेणे बंधनकारक राहील.

६) सदर काम चालू असतांना "श्रीं" च्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना कोणतीही इजा होणार नाही. यांची काळजी घेणेची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

७) विद्युत रोषणाई करतांना अथवा त्यानंतर सदर कामामुळे काही अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच विद्युत रोषणाई कामामुळे वरील पवित्र इमारतीचे काहीही नुकसान होऊ नये यांची खबरदारी घ्यावी. नुकसान झाल्यास न्यासामार्फत नुकसान भरपाईची रक्कम कंत्राटदाराच्या बिलातून वजा करण्यात येईल.

८) दरपत्रकातील नमूद बीड ऑफ कोटेशन (BOQ) व्यतिरिक्त वाढीव काम करणे आवश्यक असल्यास अशा स्वरूपाचे अतिरिक्त काम कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने करण्यात यावे. ऐनवेळी झालेल्या अतिरिक्त कामाचे प्रदान दरपत्रकधारकाराने दिलेल्या दरानुसारच करण्यात येईल. न्यास प्रशासनाने काम प्रमाणित केल्यानंतर व त्यास मान्यता दिल्यानंतर बिलाची अंतिम रक्कम अदा करण्यात येईल.

९) विद्युत रोषणाईचे काम पूर्ण झाल्यानंतर बिलाची रक्कम आरटीजीएस मार्फत अदा करण्यात येईल. कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम दिली जाणार नाही. ऐनवेळी झालेल्या अतिरिक्त कामाचे प्रदान दरपत्रकधारकाराने दिलेल्या दरानुसारच करण्यात येईल. न्यास प्रशासनाने काम प्रमाणित केल्यानंतर व त्यास मान्यता दिल्यानंतर बिलाची अंतिम रक्कम अदा करण्यात येईल.

१०) दरपत्रकात नमूद केलेल्या कामासाठी कंत्राटदाराने दुसऱ्या उप कंत्राटदारास काम न देता सदरील स्वत:करणे बंधनकारक राहील. उप कंत्राटदारास काम दिल्याचे निदर्शनास आल्यास बिलातून २५% रक्कम वजा करण्यात येईल. याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी.

११) उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास समितीने राखून ठेवलेला आहे. कंत्राटदाराची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत. दरपत्रकामधील अटी शर्तीचा व कागदपत्रांचा अभ्यास करून दरपत्रके सादर करावी.

दरपत्रकासंबंधी काही शंका असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

अ श्रीम. राखी चव्हाण, कार्यकारी अधिकारी – मोबाईल क्रमांक. ९७०२५४८२०४

ब. श्री. शाम वाघ, वित्त व लेखा अधिकारी उप कार्यकारी अधिकारी –मोबाईल क्रमांक९८२१८६६२०५

क. श्री. जनार्दन शिरवडकर, पर्यवेक्षक – मोबाईल क्रमांक. ९८६७७२०११

ड. श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालय, दूरध्वनी क्र. ०२२–६२४९१११११

०२२–६२४९१११२

तरी वरील सर्व अटी व शर्तीस अनुसरून आपले दरपत्रक भरण्याचे करावे.

(राखी चव्हाण)
कार्यकारी अधिकारी